सं. फौ. ख. क्र.३०/२०१५ निशाणी ८२

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ४ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – हुसेन खान मुमताज खान

वय – ५४ वर्षे, व्यवसाय – पो.शि.पोलीस मुख्यालय, अकोला

पत्ता – वाशिम बायपास, गंगानगर, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. दि. २४.११.२०१४ रोजी मी पो.कॉ. म्हणुन पोलीस स्टेशन उरळ येथे कार्यरत होतो. तेथे कार्यरत असतांना श्री. काटकर यांनी कवठा बॅरेज येथे उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी रेड करण्यास सांगितले आहे म्हणुन आमच्या सोबत चला असे सांगितले. नरेंद्र विश्वनाथ शिंदे, अशोक चाटी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गणेश गावंडे, श्री.काटकर आणि मी असे कवठा बॅरेज येथे सरकारी वाहनाने गेलो. त्या ठिकाणी गेल्यावर आम्हाला दिसले की, तेथे एक टॅंकर एम.एच. २८ बी. ७३४५ क्रमांकाचा होता. त्या टॅंकर मधुन पाईप लावुन दुसऱ्या बॅरलमध्ये टॅंकर खाली करत होते. त्यांनी मशिन लावलेली होती. टॅंकर चालकाचे नाव जयवंत माने होते. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गणेश गावंडे यांनी टॅंकर चालकास विचारणा केली की, तुम्ही टॅंकर पेट्रोलपंपला न नेता या ठिकाणी का आणला. टॅंकर चालकाने उडवाउडवीचे उत्तरे दिली. त्या व्यतिरिक्त आणखी काही सांगितले मला माहित नाही. त्या ठिकाणी कारवाई करतांना उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गणेश गावंडे यांच्या सांगण्यावरुन कर्मचारी यांनी बॅरल आणि टॅंकर मधील सॅम्पल काढले. सॅम्पल सिल करुन त्या ठिकाणी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. घटनास्थळ व जप्ती पंचनामा केल्यानंतर आरोपींना अटक केली. घटनास्थळी आजुन काय केले मला आठवत नाही.

**(साक्षीदाराने त्याचे मुळ कथनाशी विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन उलट तपास स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी दिली.)**

२. क्लीनर राजमोहम्मद ईस्माईल गायगाव येथील ऑईल डेपोमधुन ६००० लिटर पेट्रोल व ६००० लिटर डिझेल अग्रवाल यांच्या निंबा फाटा येथील पेट्रोपंपावर

पोहोचवण्यासाठी आलो होतो असे जयवंत माने यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गणेश गावंडे यांना सांगितले होते. त्यांनी असे सांगितले की, त्यापैकी ६००० लिटर पेट्रोल व ३००० लिटर डिझेल निंबा फाटा येथील पेट्रोलपंपावर उतरवले. उरलेले ३००० लिटर डिझेल कवठा बॅरेज येथे उतरविण्यासाठी मॅनेजर कैलास खट्टी याने सांगितले. त्यानुसार आम्ही बॅरेज प्रोजेक्ट मॅनेजर मंजुनाथ पटन शेट्टी यांचे सोबत कवठा येथे आलो व डिझेल लोखंडी टाकी मध्ये खाली करु लागलो. १००० लिटर डिझेल उतरविले असता त्या ठिकाणी पोलीस आल्याने आम्ही आमचे काम थांबविले असेही जयवंत माने याने सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठिकाणी जमीनीत अर्धवट गाडलेल्या टाकीला कुलुप लावुन सिल लावले होते. डिझेल असलेले टँकर व इतर साहित्य तसेच जमीनीत गाडलेल्या टाकीमधील डिझेल असे एकुण ३००० लिटर डिझेल ताब्यात घेतले. सदर लोखंडी टाकीमध्ये बेकायदेशीरित्या डिझेल उतरवुन साठवतांना आढळले. कारवाई झाल्यानंतर सर्व साहित्य आणि आरोपींना घेवुन उरळ पोलीस स्टेशनला आलो. सदर घटनेची फिर्याद उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गावंडे यांनी दिली. मी घटनास्थळी आरोपी जयवंत माने यास पाहिले होते. आरोपी जयवंत माने आजरोजी न्यायालयात हजर नाही. कैलास खट्टी, मंजुनाथ पटन शेट्टी आणि राज मोहम्मद शेख ईस्माईल यांना मी घटनेच्या वेळी पाहिले होते. चारही आरोपीपैकी आजरोजी मंजुनाथ पटन शेट्टी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. एन.एम.अग्रवाल यांचे मार्फत</u>**

३. घटना घडली त्यावेळी कवठा शिवरातील धरणचे काम सुरु होते. त्या ठिकाणी धरणाच्या कामासाठी मोठमोठे खड्डे होते आणि खोदकामासाठी जे.सी.बी. सारखे मशिन त्या ठिकाणी होते. हे म्हणणे खरे नाही की, जे.सी.बी. किंवा इतर मशिन धरणात उतरल्यानंतर त्यांना जागेवरच डिझेल पुरवठा करावा लागत होता.

प्रश्न – ज्या लोखंडी टाकीमध्ये डिझेल उतरविले ती लोखंडी टाकी तुम्ही जप्त केली नाही ?

उत्तर – लोखंडी टाकी जप्त करुन त्याला कुलुप लावुन जप्त केले होते.

लोखंडी कोणाच्या मालकीची आहे त्याबाबत मी चौकशी केली नाही. लोखंडी टाकीच्या निरिक्षणाकरीता पेट्रोलियम आणि एक्सप्लोजिव्ह विभागातील लोकांना बोलवुन त्याचे निरिक्षण करुन घेतले. निरिक्षण करीता विभागाकडुन कोण आले होते त्यांची नावे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दिवशी घटनास्थळवर हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे बयान पोलीस स्टेशनला नोंदविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटा पुरावा देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींपैकी कोणालाही ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मंजुनाथ पटन शेट्टी न्यायालयात हजर असल्याचे मी खोटे सांगत आहे. (न्यायालयात हजर असलेल्या आरोपीस त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव कैलास खट्टी असल्याचे सांगितले.)

<u>उलटतपास आरोपी क्र. ४ तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी. इंगळे यांचे मार्फत</u>

४. हे म्हणणे खरे नाही की, दि. २४.११.२०१४ रोजी मी पोलीस स्टेशन उरळ येथे कर्तव्यावर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सरकारी वकीलांनी "क्लीनर राज मोहम्मद ईस्माईल गायगाव येथील ऑईल डेपोमधुन ६००० लिटर पेट्रोल व ६००० लिटर डिझेल अग्रवाल यांच्या निंबा फाटा येथील पेट्रोपंपावर पोहोवण्यासाठी आलो होतो असे जयवंत माने यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गणेश गावंडे यांना सांगितले होते. त्यांनी असे सांगितले की, त्यापैकी ६००० लिटर पेट्रोल व ३००० लिटर डिझेल निंबा फाटा येथील पेट्रोलपंपावर उतरवले. उरलेले ३००० लिटर डिझेल कवठा बॅरेज येथे उतरविण्यासाठी मॅनेजर कैलास खट्टी यांने सांगितले. त्यानुसार आम्ही बॅरेज प्रोजेक्ट मॅनेजर मंजुनाथ पटन शेट्टी यांचे सोबत कवठा येथे आलो व डिझेल लोखंडी टाकी मध्ये खाली करु लागलो. १००० लिटर डिझेल उतरविले असता त्या ठिकाणी पोलीस आल्याने आम्ही आमचे काम थांबविले असेही जयवंत माने याने सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठिकाणी जमीनीत अर्धवट गाडलेल्या टाकीला कुलुप लावुन सिल लावले होते. डिझेल असलेले टँकर व इतर साहित्य तसेच जमीतनीत गाडलेल्या टाकीमधील डिझेल असे एकुण ३००० लिटर डिझेल ताब्यात घेतले. सदर लोखंडी

टाकीमध्ये बेकायदेशीररित्या डिझेल उतरवुन साठवतांना आढळले. कारवाई झाल्यानंतर सर्व साहित्य आणि आरोपींना घेवुन उरळ पोलीस स्टेशनला आलो" असे वाचुन सांगितले म्हणुन मी घटना घडली आहे असे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.04.05 12:19:10 +0530

बाळापूर. (श्रीमती डी. एम. पाटील)
दि. ०३/०४/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.